Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यातील सहसंबंधाचा अभ्यास

डॉ. प्रिया नरेंद्र कुरकुरे
सहाय्यक प्राध्यापक
आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
शिरपूर

सारांश- *प्रस्तुत संशोधनात वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यांतील सहसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला. शिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयाच्या कला, विज्ञान व वाणिज्य शाखेत अध्ययन करणारे सर्व विद्यार्थी ही संशोधनाची जनसंख्या निश्चित केली आहे. सहेतुक नमुना निवड पद्धतीने एकूण ९० विद्यार्थ्यांची (प्रत्येकी ३०) नमुना म्हणून निवड करण्यात आली. माहिती संकलनासाठी संशोधकाने स्वनिर्मित नैतिक निर्णय-क्षमता मापिका व सामाजिक आरोग्य मापिकेचा वापर केला आहे. प्रत्येकी ३० विधाने होती. संकलित माहितीच्या विश्लेषणासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा वापर करण्यात आला. अभ्यासातून शाखा व लिंगानुसार विद्यार्थ्यांमध्ये नैतिक निर्णय-क्षमता व सामाजिक आरोग्य यांचा सकारात्मक सहसंबंध आढळून येतो.*

Key words: *वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी, नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य*

प्रस्तावना

शिक्षण ही केवळ ज्ञानार्जनाची प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची सामाजिक प्रक्रिया आहे. महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थी बौद्धिक प्रगतीबरोबरच नैतिक, सामाजिक आणि भावनिक विकासाच्या महत्त्वाच्या टप्प्यातून जात असतात. या काळात त्यांना विविध सामाजिक परिस्थिती, नातेसंबंध, जबाबदाऱ्या आणि निर्णयप्रक्रिया अनुभवायला मिळतात. अशा वेळी योग्य-अयोग्य याचा विचार करून जबाबदारीने निर्णय घेण्याची क्षमता म्हणजेच नैतिक निर्णय-क्षमता अत्यंत महत्त्वाची ठरते. नैतिक निर्णय-क्षमता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रामाणिकपणा, न्यायबुद्धी, सहानुभूती, शिस्त आणि जबाबदारी या मूल्यांना दृढ करते. ही मूल्ये विद्यार्थ्यांच्या दैनंदिन वर्तनात प्रतिबिंबित होतात आणि त्यांच्या समाजाशी असलेल्या संबंधांवर प्रभाव टाकतात. विद्यार्थ्यांचे मित्र, शिक्षक, कुटुंब आणि समाजाशी असलेले सुसंवाद,

सहकार्याची वृत्ती, समायोजनाची क्षमता आणि सामाजिक नियमांचे पालन या बाबी सामाजिक आरोग्य दर्शवितात.

वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर कला, विज्ञान आणि वाणिज्य अशा विविध शाखांतील विद्यार्थी विविध पार्श्वभूमीतून येतात. त्यांच्या सामाजिक अनुभवांमध्ये व विचारप्रक्रियेत वैविध्य असते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांची नैतिक निर्णय-क्षमता त्यांच्या सामाजिक आरोग्यावर कसा परिणाम करते, याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक सामाजिक वर्तन आणि सुदृढ सामाजिक संबंध निर्माण होण्यासाठी नैतिक मूल्यांची भूमिका किती महत्त्वाची आहे, हे समजून घेणे शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, व्यवस्थापन आणि धोरणकर्त्यांसाठी उपयुक्त ठरते. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनात वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यांतील सहसंबंधाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या अभ्यासातून विद्यार्थ्यांच्या नैतिक व सामाजिक विकासाचा परस्परसंबंध स्पष्ट होऊन शिक्षणप्रक्रियेत मूल्य शिक्षण आणि सामाजिक कौशल्यांच्या संवर्धनाला दिशा मिळेल, अशी अपेक्षा आहे.

समस्या विधान

शिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यातील सह्संबंधाचा अभ्यास करणे.

उद्दिष्टे

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यातील सह्संबंधाचा अभ्यास करणे.
२. वरिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यातील सह्संबंधाचा अभ्यास करणे.
३. वरिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यातील सह्संबंधाचा अभ्यास करणे.
४. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यातील सह्संबंधाचा अभ्यास करणे.

परिकल्पना

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.
३. वरिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.
४. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यामधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.

संशोधनाची कार्यपद्धती

- **संशोधन पद्धती**- वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील भावनिक नियमनचा आणि सामाजिक आरोग्य यातील सह्संबंधाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सहसंबंध पद्धतीचा अवलंब केला आहे.
- **जनसंख्या**- प्रस्तुत संशोधनात, शिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील (कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या) सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांची संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली आहे.
- **न्यादर्श**- सहेतुक नमुना निवड पद्धतीने वरिष्ठ महाविद्यालयातील एकूण ९० विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली होती. ते खालीलप्रमाणे...

अ. नं.	कला शाखा	विज्ञान शाखा	वाणिज्य शाखा	एकूण
०१	३०	३०	३०	९०

- **संशोधन साधने**- प्रस्तुत संशोधनात संशोधकाने खालील स्वनिर्मित प्रश्नावलीचा अवलंब माहिती संकलनासाठी करण्यात आला आहे.
  १. **भावनिक नियमन**- प्रस्तुत संशोधनात, वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे नैतिक निर्णय-क्षमता मापन करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित नैतिक निर्णय-क्षमता मापिकेचा अवलंब केला आहे. त्यात एकूण ३० विधाने होती. प्रतिसाद नोंदविण्यासाठी सहमत, असहमत व सांगता येत नाही हे पर्याय देण्यात आले. (योग्य-अयोग्य याची जाणीव, न्यायबुद्धी, प्रामाणिकपणा, सहानुभूती, नैतिक तर्कशक्ती, सामाजिक मूल्यांचे पालन, आत्मसंयम, सहकार्याची वृत्ती, निर्णयातील स्थिरता)
  २. **सामाजिक आरोग्य**- प्रस्तुत संशोधनात, वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सामाजिक आरोग्याचे मापन करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित सामाजिक आरोग्य मापिकेचा अवलंब केला आहे. त्यात एकूण ३० विधाने होती. प्रतिसाद नोंदविण्यासाठी सहमत, असहमत व सांगता येत नाही हे पर्याय देण्यात आले. (सामाजिक समायोजन, सामाजिक संबंधांची गुणवत्ता, संवाद कौशल्य, सामाजिक जबाबदारी, सहकार्याची वृत्ती)
- **संख्याशास्त्रीय परिमाणे**- प्रस्तुत संशोधनातील संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन व 'r' मुल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे.

संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रस्तुत संशोधनात वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यातील सह्संबंधाचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वनिर्मित प्रश्नावाल्या देण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण करून पुढील प्रमाणे परिकल्पना परीक्षण करण्यात आले होते.

परिकल्पना परीक्षण

१. **वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.**

तक्ता क्र. ०१

कला शाखा	नमुना	सारणी 'r' मूल्य	प्राप्त 'r' मूल्य	त्याग/स्वीकार
नैतिक निर्णय-क्षमता सामाजिक आरोग्य	३०	.१९५	.६५९	त्याग

- **निरीक्षण व निष्कर्ष** - तक्ता क्रमांक- ०१ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य .६५९ आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ स्तरावर) ०.१९५ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, वरिष्ठ महाविद्यालयातीलकला शाखेतील विद्यार्थ्यामधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य .६५९ हे दर्शवते की नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यांच्यात धनात्मक सहसंबंध आहे. ज्या विद्यार्थ्यांची नैतिक निर्णय-क्षमता सकारात्मक असते, त्यांचे सामाजिक आरोग्य देखील जास्त असते.

२. **वरिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.**

तक्ता क्र. ०२

विज्ञान शाखा	नमुना	सारणी 'r' मूल्य	प्राप्त 'r' मूल्य	त्याग/स्वीकार
नैतिक निर्णय-क्षमता सामाजिक आरोग्य	३०	.१९५	.७५५	त्याग

- **निरीक्षण व निष्कर्ष** - तक्ता क्रमांक- ०२ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य .७५५ आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ स्तरावर) ०.१९५ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, वरिष्ठ महाविद्यालयातीलविज्ञान शाखेतील विद्यार्थ्यामधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य .७५५ हे दर्शवते की नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यांच्यात धनात्मक सहसंबंध आहे. ज्या विद्यार्थ्यांची नैतिक निर्णय-क्षमता सकारात्मक असते, त्यांची सामाजिक आरोग्य देखील जास्त असते.

३. वरिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.

तक्ता क्र. ०३

वाणिज्य शाखा	नमुना	सारणी 'r' मूल्य	प्राप्त 'r' मूल्य	त्याग/स्वीकार
नैतिक निर्णय-क्षमता	३०	.१९५	.६४४	त्याग
सामाजिक आरोग्य				

- **निरीक्षण व निष्कर्ष** - तक्ता क्रमांक- ०३ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य .६४४ आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ स्तरावर) ०.१९५ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, वरिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यामधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य .६४४ हे दर्शवते की नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यांच्यात धनात्मक सहसंबंध आहे. ज्या विद्यार्थ्यांची नैतिक निर्णय-क्षमता सकारात्मक असते, त्यांची सामाजिक आरोग्य देखील जास्त असते.

४. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.

तक्ता क्र. ०४

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी	नमुना	सारणी 'r' मूल्य	प्राप्त 'r' मूल्य	त्याग/स्वीकार
नैतिक निर्णय-क्षमता	४५	.१९५	.७४६	त्याग
सामाजिक आरोग्य				

- **निरीक्षण व निष्कर्ष** - तक्ता क्रमांक- ०४ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य .७४६ आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ स्तरावर) ०.१९५ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यामधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य .७४६ हे दर्शवते की नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यांच्यात धनात्मक सहसंबंध आहे. ज्या विद्यार्थ्यांची नैतिक निर्णय-क्षमता सकारात्मक असते, त्यांची सामाजिक आरोग्य देखील जास्त असते.

निष्कर्ष

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येतो.
२. वरिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येतो.

३. वरिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येतो.
४. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यात सार्थ सहसंबध आढळून येतो.

निष्कर्षाच्या आधारावर चर्चा

दिलेल्या निष्कर्षांवरून असे स्पष्ट होते की वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील तसेच एकूण विद्यार्थ्यांमध्ये नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यांच्यात सार्थ सहसंबंध आढळतो. याचा अर्थ असा की ज्या विद्यार्थ्यांची योग्य-अयोग्य ठरविण्याची क्षमता, प्रामाणिकपणा, न्यायबुद्धी, सहानुभूती आणि जबाबदारीची जाणीव अधिक असते, त्या विद्यार्थ्यांचे सामाजिक वर्तन, समाजाशी जुळवून घेण्याची क्षमता, सहकार्याची वृत्ती आणि सामाजिक संबंध अधिक सकारात्मक असतात. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थी विविध सामाजिक परिस्थितींना सामोरे जातात. मित्रमैत्रिणी, शिक्षक, कुटुंब, समाज आणि विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या लोकांशी संवाद साधताना त्यांना अनेकदा नैतिक निर्णय घ्यावे लागतात. अशा वेळी विद्यार्थ्यांची नैतिक निर्णय-क्षमता त्यांना योग्य मार्ग निवडण्यास मदत करते. यामुळे त्यांचे सामाजिक संबंध सुदृढ राहतात आणि त्यांचे सामाजिक आरोग्य चांगले राहते. ही बाब सर्व शाखांमध्ये समानपणे आढळल्याने नैतिक मूल्यांचे महत्त्व सर्व विद्यार्थ्यांसाठी सारखेच आहे, हे अधोरेखित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात प्रामाणिकपणा, शिस्त, सहकार्य, सहानुभूती यांसारखी मूल्ये आचरणात आणली पाहिजेत. विविध समाजोपयोगी उपक्रम, स्वयंसेवा, गटकार्य, चर्चासत्रे यामध्ये सक्रिय सहभाग घेतल्यास त्यांची नैतिक निर्णय घेण्याची क्षमता अधिक बळकट होते आणि सामाजिक समायोजन सुधारते. सामाजिक परिस्थितींमध्ये योग्य निर्णय घेण्याचा सराव विद्यार्थ्यांनी सतत केला पाहिजे.

शिक्षकांची भूमिका या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची आहे. अध्यापन करताना शिक्षकांनी नैतिक मूल्यांवर आधारित उदाहरणे, कथा, प्रसंग आणि चर्चांचा समावेश करावा. गटचर्चा, भूमिकानाट्य, प्रकल्पकार्य यांद्वारे विद्यार्थ्यांसमोर नैतिक निर्णय घेण्याच्या परिस्थिती निर्माण कराव्यात. विद्यार्थ्यांच्या सकारात्मक सामाजिक वर्तनाला प्रोत्साहन देऊन त्यांना योग्य दिशादर्शन करावे. महाविद्यालय व्यवस्थापनाने मूल्य शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक कौशल्यांशी संबंधित कार्यशाळा, व्याख्याने आणि उपक्रम आयोजित करावेत. NSS, NCC आणि समाजसेवा उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यास विद्यार्थ्यांना समाजाशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याची संधी मिळते. महाविद्यालयात सुरक्षित, समावेशक आणि सकारात्मक वातावरण निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे. विद्यापीठ पातळीवर अभ्यासक्रमात मूल्य

शिक्षण, नैतिकता आणि सामाजिक आरोग्याशी संबंधित घटकांचा समावेश केला पाहिजे. शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक आणि सामाजिक गुण विकसित करण्यासाठी आवश्यक कौशल्ये दिली पाहिजेत. यावरून असे निष्पन्न होते की शिक्षण ही केवळ ज्ञान देण्याची प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांच्या नैतिक व सामाजिक विकासाचीही प्रक्रिया आहे. नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यांचा परस्पर संबंध लक्षात घेता, शिक्षणप्रक्रियेत नैतिक मूल्ये आणि सामाजिक कौशल्ये यांना प्राधान्य दिल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन ते जबाबदार आणि सजग नागरिक बनू शकतात. या निष्कर्षांच्या आधारे शैक्षणिक स्तरावर काही महत्त्वपूर्ण उपाययोजना करणे आवश्यक आहे.

महाविद्यालयातील प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने समुपदेशन केंद्र, तणाव व्यवस्थापन कार्यशाळा, तसेच mindfulness, योग यांसारख्या उपक्रमांचे आयोजन करावे. शिक्षकांनी अध्यापनासोबत विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांकडे लक्ष देऊन त्यांना व्यक्त होण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करावे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या भावनांची जाणीव ठेवून ध्यान, योग, लेखन यांसारख्या तंत्रांचा वापर करून भावनिक संतुलन राखण्याचा प्रयत्न करावा. तसेच अभ्यास मंडळाने अभ्यासक्रमात जीवनकौशल्ये, भावनिक बुद्धिमत्ता आणि सामाजिक आरोग्य या विषयांचा समावेश करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर द्यावा.

एकंदरीत, नैतिक निर्णय-क्षमता आणि सामाजिक आरोग्य यांच्यातील सकारात्मक सहसंबंध लक्षात घेता, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या भावनिक व सामाजिक विकासावरही तितक्याच गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. अशा समतोल विकासामुळे विद्यार्थी अधिक सक्षम, आत्मविश्वासू आणि सामाजिकदृष्ट्या समायोजित नागरिक म्हणून घडू शकतात.

संदर्भग्रंथ सूची

Best & Kahn. (2006). *Research in Education (9th Ed).* Delhi: Prentice Hall of India.

Dwivedi, K. N., & Harper, P. B. (2004). Emotion regulation and mental health. *Promoting the emotional well-being of children and adolescents and preventing their mental ill health: A handbook*, 69-84.

Garrett, H .E. (2006). *Statistics in Psychology & Education* (1st Ed. Indian Reprint). Delhi: Sage Publication.

Kumar, Ranjit. (2011). *Research Methodology a step by step guide for beginners* (3rd Ed). New Delhi: Sage Publication.

Raja Kumar, P.G. (2013). *Research Methodology (1st Ed.).* Delhi: APH Publishing Corporation.

Saxena, P., Dubey, A., & Pandey, R. (2011). Role of emotion regulation difficulties in predicting mental health and well-being. *SIS Journal of Projective Psychology & Mental Health*, *18*(2), 147-155.

आगलावे, प्रदीप. (२०००). *संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे,* नागपूर: विद्या प्रकाशन.

घोरमोडे, के. यु., घोरमोडे, कला, (२००८). *शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे,* नागपूर: विद्या प्रकाशन.

भितांडे, वि. रा. (२००७). *शैक्षणिक संशोधन पद्धती.* (प्रथम आवृत्ती). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

मुळे व उमाठे. (१९९८). *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे.* (तिसरी आवृत्ती). नागपूर: विद्या बुक्स प्रकाशन.